फक्त ८८ म्हणा!

आमचा आमदार
सर्वसामान्यांसाठी
लढणारा
आमदार





माझा महाराष्ट्र भगवा महाराष्ट्र

# मी घडलो... आणि मला घडवलं...

**आमदार राजेश विनायकराव क्षीरसागर**
**(कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघ)**

"हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे ही एक दैवी शक्ती... हीच शक्ती देशाला आणि राज्याला तारू शकेल, याचा अनुभव देशवासियांनी कित्येक वेळा घेतला आहे. शिवसेना पक्षप्रमुख मा. उध्दवसाहेब ठाकरे हे एक सुसंस्कृत, प्रामाणिक नेतृत्व असून महाराष्ट्राला विकासाकडे नेण्याचे काम फक्त मा. उध्दवसाहेबच करू शकतील. मा. उध्दवसाहेबांचे नेतृत्वगुण अवघ्या महाराष्ट्राने पाहीले, या लोकसभा निवडणुकीमध्ये शिवसेनेशी गद्दारी केलेल्या सर्वांचाच हिशेब चुकता झाला. आजपर्यंत माझ्या जडणघडणीमध्ये शिवसेनाप्रमुखांचे आशिर्वाद, पक्षप्रमुख मा. उध्दवजींचे प्रेम आणि माझे वडील श्री. विनायकराव क्षीरसागर आणि आई स्वर्गिय सौ. मालन यांचे पाठबळ लाभले. त्यांच्या शुभ आर्शिवादामुळेच माझा हा प्रवास सुकर झाला.

2009 सालासाठीच्या विधानसभा निवडणुकीकरीता माझ्या कारकिर्दीचा लेखा- जोखा पाहून आणि पक्ष संघटन मजबुत केल्यामुळेच हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे आणि पक्षप्रमुख मा. उध्दवसाहेब ठाकरे यांनी मला आमदारकीचे तिकीट दिले आणि माझ्यासाठी झटणाऱ्या शिवसैनिक, मित्रमंडळी, पाहुणे आणि सर्वसामान्य जनतेने माझ्यावर दाखविलेल्या विश्वासाच्या जोरावरच मी आमदार झालो. त्याबद्दल मी सर्वांचा शतशः ऋणी आहे.

आमदार झाल्यावर सत्तेची धुंदी न येवुन देता, आपल्यावर पक्षाने जी जबाबदारी टाकली आणि करवीरनगरीतील जनतेने मतांद्वारे जो कौल दिला, त्याला सार्थ ठरविण्यासाठी दिवसाची रात्र करून, त्यांच्या प्रश्नांना आणि शहराच्या सर्वांगिण विकासासाठी झटण्याची खुण-गाठ मनाशी बांधून विधानसभेत शहरातील समस्यांविषयी चौफेर टोलेबाजी करून, शासनाला माझ्या प्रत्येक प्रश्नाकडे लक्ष देण्यास भाग पाडत शहराच्या एक- एक प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम सुरू केले. यामध्ये माझे सासरेबुवा जेष्ठ अभ्यासु माजी नगरसेवक स्वर्गिय बापुसाहेब मोहिते यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. आजपर्यंत न सुटलेल्या कोल्हापूर शहराच्या थेट पाईपलाईन प्रश्नाकरीता आमरण उपोषण करून हा करवीरवासीयांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नाला मार्गी लावण्यात आपण यशस्वी झालो, त्यामुळे आत्मिक समाधान तर मिळालेच परंतु इतर समस्यांनाही हाताळण्यासाठी उभारी मिळाली. करवीरवासीयांवर लादलेल्या अमानुष टोल रद्द करण्यासाठी माझ्यासह पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी जीवाचे रान केले, आक्रमक व उग्र स्वरूपाची आंदोलने करून शासनास टोलला विरोधच हे ठाम ठणकावून सांगितले. एल. बी. टी., गॅस दरवाढ, कचरा, हद्दवाढ, घरफाळा, महागाई, रेशनचा काळाबाजार, रस्ते, पाणी, अशा विविध प्रश्नांवर सातत्याने आंदोलने करून या प्रश्नांकडे लक्ष देण्यासाठी शासनास भाग पाडले. दीन- दलीतांचे कैवारी राजर्षि छ. शाहु महाराज यांची त्यांच्याच कोल्हापूर शहरामध्ये निष्क्रीय कॉंग्रेस – राष्ट्रवादी शासनाने क्रूर थट्टाच केली... करवीरवासीयांसाठी रोजगाराचे मुख्य साधन असलेली छ. शाहु मिल राज्य शासनाच्या धोरणांमुळे बंद पडली. छ. शाहु मिलची जागाही हडपण्याचा प्रयत्न राज्यशासनाने केला, याविरोधात आवाज उठवित छ. शाहु महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक होण्याची मागणी लावून धरली आणि यास यश मिळाले. शासनाने नमते घेत अखेर छ. शाहु स्मारकाची घोषणा केली. त्याचबरोबर करवीरवासियांना वरदायिनी असलेल्या पंचगंगा नदीच्या प्रदुषणाविरोधात सातत्याने आवाज उठवून शासनास पंचगंगा शुध्दीकरणाकरीता निधी देण्यास भाग पाडले.

शिवसेना

हे सर्व करीत असतानाच बचतगटांना उभारी मिळावी, त्यांना बाजारपेठ मिळावी, अशी कल्पना मनामध्ये घोंगावत होती. माझी ही कल्पना माझी पत्नी सौ. वैशाली यांनाही पटली आणि त्यांनीच पुढाकार घेत "भगिनी मंच" या महिला संघटनेची स्थापना केली. यानंतर सलग चार वर्षे "भगिनी महोत्सव" चे आयोजन केले. यामध्ये त्यांना मोफत स्टॉल्स्‌देवून त्यांच्या वस्तुंचा भव्य बाजारपेठ उपलब्ध करून आर्थिक बळकटी देण्याचे छोटेसे काम केले. गारमेंट पार्क सुरू करून 100 महिलांना रोजगार देवून असे उद्योग करण्याकरीता पदाधिकाऱ्यांनाही सक्षम करण्याचे काम करत राहीलो. माझे चिरंजीव कु. ऋतुराज यांनीही विद्यार्थी दशेतच युवकांची मोट बांधीत, युवकांचे संघटन करून प्रवोधनाचे काम केले आहे. त्यांच्यामार्फत दरवर्षी "मैत्री युवा महोत्सव" आयोजित केला जातो आणि याला माझे लहान चिरंजीव कु. पुष्कराज यांचीही मोलाची साथ मिळत आहे.

अजुनही बरेचसे करण्यासारखे आहे, जनतेने टाकलेल्या विश्वासाला आपण पुरेपुर खरे उतरण्यासाठी बरेच लढायचे आहे आणि माझ्यातला शिवसैनिक त्यासाठी "फक्त लढ म्हणा" हा मुलमंत्र घेवूनच रस्त्यावर उतरला आहे.

हा माझ्या कार्याचा लेखाजोखा तुमच्यासमोर मांडताना एक गोष्ट तुमच्यासोबत वाटावीशी वाटते. मध्यंतरीच्या काळात आमचे दैवत शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या विरोधात बेळागावात निषेधाच्या घोषणा देवून अवमान करण्यात आला, ही गोष्ट माझ्यासारख्या कट्टर शिवसैनिकास न खपणारी होती. कोणत्याही परिस्थितीत अशा नतदृष्ट्यांना धडा शिकवायचाच म्हणून मी वाट पाहत होतो आणि ती वेळ आली, एका वृत्तवाहीनीच्या कार्यालयामध्ये हे नतदृष्टये मुलाखतीला येणार असल्याचे समजले आणि माझ्यासमवेत मोजक्या शिवसैनिकांना घेवून तिथे धडक मारली आणि त्या कन्नड वेदीकेच्या गुंडाना धडकी भरावी, अशी अद्दल घडवली. आमच्यावर गुन्हे दाखल झाले. परंतु त्याचवेळेला माझ्या फोनवर "मातोश्री" वरून मोठया साहेबांना बोलायचेय असे सांगितले... मी हो म्हणताच, दुसरीकडून धीरगंभीर आवाज आला...

जय महाराष्ट्र...

शाब्बास... खरे शिवसैनिक आहात तुम्ही, असंच पाहीजे, सोडायचं नाही कुणाला... तुम्ही काल जे केलं, ते योग्यच होत.

ती म्हण आहे ना... वेगात मराठे वीर दौडले सात... त्यांच्यासारखा मुर्खपणा करायचा नाही, शत्रुला कमी लेखायचं नाही, शत्रुला सोडायच नाही, मग तो बिलोलखान असो, कोणीही असो...

कोल्हापूरचे आहात तुम्ही, हे मर्द मराठयांचं स्पिरीट असंच राहील पाहीजे... धन्यवाद... दिर्घायुषी भवं... शतायुषी भवं... यशस्वी भवं... आयुष्यमान भवं... जय महाराष्ट्र!!

असे साहेबांचे शब्द माझ्या कानावर पडले आणि त्यांच्या या आशिर्वादाने माझ्यातल्या शिवसैनिकाला आणखीनच उभारी मिळाली...

गेल्या गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीमध्ये तरूण मंडळांच्या कार्यकर्त्यांवर पोलीस प्रशासनाने लाठीचार्ज केला, त्यामध्ये उडालेल्या गोंधळामध्ये महिला आणि लहान मुले जखमी झाले. त्यामुळे न रहावून या लाठीचार्जला मी विरोध केला. तर पोलीस प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी पुर्वनियोजीत कट कारस्थान रचून माझ्यासह माझ्या कार्यकर्त्यांना टार्गेट करीत आमचेवरच अमानुष लाठीचार्ज केला, यामध्ये कार्यकर्ते गंभीर जखमी झाले. यात माझे काय चुकले...? उलट आमचेवरच विनयभंगा सारखी जाचक कलमे लावून आम्हाला अडकविले गेले. मी घेतलेली भुमिका योग्यच होती हे पटवून देत मी पोलीस ठाण्यात हजर होताना हजारोंच्या संख्येने जनता माझ्या पाठीशी ठाम रहात रस्त्यावर उतरली. याच जनतेच्या विश्वासाने मला पाठवळ मिळाले. आजपर्यंत घडलेल्या माझ्या सुख-दुःखाच्या क्षणामध्ये माझे सहकारी शिवसैनिक व स्वाभिमानी करवीरवासीय जनतेने मला अमुल्य साथ दिली. कट्टर शिवसैनिक आणि स्वाभिमानी जनता यांच्या बळावरच मी घडलो आणि येथुन पुढील काळात ध्यास आहेत ते जनतेच्या, त्यांच्या समस्यांच्या आणि शहराच्या विकासासाठी झटण्याचे...

आजपर्यंत करवीरवासीयांनी दिलेल्या पाठबळावर देशातील पहीले जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र, अद्ययावत मठ तालीम, श्री सिध्देश्वर मंदीर, उत्तरेश्वर - शिंगणापुर रोड, राजाराम बंधारा रोड यासह इतर विकास कामे करण्यात यशस्वी झालोच. त्याचबरोबर येणाऱ्या काळामध्ये कोल्हापूर शहरास तिर्थ क्षेत्र आराखडा मंजूर करणे, कोल्हापूर शहरास विमानसेवा पुर्ववत सुरू करणे, रस्ते चौपदरीकरण, शहरातील बाग- बगीचे, प्रमुख चौक यांचे सुशोभिकरण, महिला बचत गटांना रोजगार निर्मीती, युवकांना रोजगार, पंचगंगा नदी व बावडा घाट परिसराचा विकास, रंकाळा तलावाचे सुशोभिकरण यासह शहरवासीयांना मुलभुत सोयी- सुविधा पुरविण्याकरीता मी कटीवध्द राहीन... त्याकरीता मला फक्त आपली साथ हवी... "

आपला नम्र

**आमदार राजेश क्षीरसागर**




## आमचा आमदार सर्वसामान्यांसाठी लढणारा आमदार